RCS No. 20/2026
Exh. 1

दैनिक रजि. नं.              /२०२६

दाखल तारीख :   /०२/२०२६

रेग्युलर कज्जा नं.       /२०२६

**मे.दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कागल**

**यांचे कोर्टात.....**

**शहाजी संतु उर्फ संतराम पोवार**
व.व. ५८, धंदा - व्यवसाय
रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल
जि. कोल्हापूर                                                  } **वादी**

विरुध्द

१) **अहिल्याबाई संतु उर्फ संतराम पोवार**
व.व. ५९, धंदा - अंगणवाडी सेविका,
रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल
जि. कोल्हापूर .

२) **अनिल संतु उर्फ संतराम पोवार**                                } **प्रतिवादी**
व.व. ५७, धंदा - नोकरी,
सध्या रा. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल
जि. कोल्हापूर.
कायम रा. प्लॉट नं. ४०२, श्री उमा हाईट्स
बिल्डिंग रेजेसि इन्टेट रोड, पाटीदार भवनच्या मागे
सेंट जॉन स्कुलच्या समोर दावडी, गोळवली,
डोंबीवली, पु. मुंबई ४२१ २०२३

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

३) **शंकुतलाबाई भिमराव मोरे**
व.व. ६०, धंदा - अंगणवाडी सेविका,
रा. म्हाळुंगे, ता. करवीर, जि.कोल्हापूर

४) **चंद्रकांत संतराम पोवार [म.वा]**
**सुमित चंद्रकांत पोवार उर्फ चांभार**
व.व. ३५, धंदा - गवंडी काम,
घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल
जि. कोल्हापूर.

५) ग्रामसेवक/सरपंच, सोनाळी, ता. कागल, जि. कोल्हापूर

} प्रतिवादी

**दावा - कायम मनाई ताकीदीकरिता होऊन मिळणेकरिता**
**दावेची आकारणी कोर्ट फी व ज्युरिसडिक्शनकरिता रु. १,०००/-**
**स्पेसिफिक रिलीफ ॲक्टचे कलम ३८ नुसार**

**यातील वादींचा दावा असा की,**

१) **दावा मिळकतीचे वर्णन -**

सोनाळी, ता. कागल, जि.कोल्हापूर येथील नगर भुमापन गट क्र. ४२४ एकूण क्षेत्र ३३.७० चौ.मी चे दगड, विट, मातीचे बांधलेले साधे घर ही दावा मिळकत होय यांसी चतु:सिमा

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रस्ता |
| पश्चिमेस | - | बोळ वजा लहान रस्ता |
| दक्षिणेस | - | मालुबाई विश्वनाथ पोवार यांची घर मिळकत |

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

उत्तरेस - श्री.शामराव बळवंत पोवार यांची घर मिळकत.

वर कलम १ मधील मिळकत ही **दावा मिळकत** म्हणुन संबोधणेत येते.

२) यातील वादी व प्र.वादी नं. १ ते ३ हे सख्ये बहिण भाऊ आहेत. तसेच प्र.वादी नं. ४ हे चंद्रकांत संतराम पोवार [चाभांर] हे सन २०१० मध्ये मयत आहेत. त्यामुळे प्र.वादी नं. ४ हे मयत वारस हे त्यांचा मुलग्यास घेतले आहे व तो वादी व प्र.वादी नं. १ ते ३ यांचा पुतण्या आहे.

३) सदरचे सोनाळी, ता. कागल, जि.कोल्हापूर येथील नगर भुमापन गट नं. ४२४ चे क्षेत्र ३३.७० चौ.मी हे सन १९८२ पर्यंत संतराम तुकाराम पोवार म्हणजे यातील वादी व प्र.वादी नं. १ ते ३ यांचे वडील व प्र.वादी नं. ४ यांचे आजोबा आहेत. सदरचे घर हे सन १९८२ पर्यंत संतराम तुकाराम पोवार यांचे नावे होते. त्यांच्या हयाती नंतर एकत्र कुटुंब म्हणुन मोठे भाऊ चंद्रकांत संतु पोवार [चांभार] यांचे नाव सन १९८३ साली सदर घर मिळकतीस मालकी सदरी लागले. चंद्रकांत संतु पोवार [चांभार] हे दि. ०९/०३/२०१६ इ. रोजी मयत झाले. तदनंतर वरील वादी व प्र.वादी नं. १ ते ३ यांची नावे सदर मिळकत पत्रीकेस दि. ०४/११/२०२५ इ. रोजी मालकी कोष्टकी लागलेली आहेत.

४) सदर घरामध्ये सध्य परिस्थितीमध्ये वादी व प्र.वादी नं. १,२ व ४ हे कायम स्वरुपी वास्तव्यास आजतागयत आहेत. सदरचे घर हे जुनी विट, दगड, माती यांचे बांधलेले वडिलार्जीत पुर्वीचे २ खोल्याचे घर आहे.

५) प्रस्तुत दावेचे कामी वादी-प्रतिवादी यांची वारस वंशावळ खालीलप्रमाणे-

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

संतराम तुकाराम पोवार [वडील] मयत

चंद्रकांत [मयत] शंकुतला अहिल्याबाई शहाजी अनिल

सुमित [मुलगा]

येणेप्रमाणे प्रस्तुत दावेचे कामी वारस वंशावळ असे.

६) सदर घर मिळकत सोनाळी, ता. करवीर, जि.कोल्हापूर नगर भुमापन गट नं. ४२४ क्षेत्र ३३.७० चौ.मी या घराचे सद्य परिस्थितीमध्ये एकुण चौघे मालक आहेत. अशा परिस्थितीमध्ये सदरचे घर कोणाचीही परिवानगी, ग्रामसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सोनाळी, ता. कागल यांचे अगर इतर कोणाचीही तोंडी अगर लेखी परवानगी नसताना सदरचे घर बेकायदेशीरपणे यातील प्र.वादी नं. १ या प्र.वादी नं. २,३ व ४ यांच्या मदतीने सदरचे घर पाडण्याचे प्रयत्न सुरु आहेत. सदचे घर हे अतिशय जुने आहे त्यामध्ये वादी व प्र.वादी नं. १,२ व ४ हे कायम स्वरुपी राहण्यास आहेत. अशा परिस्थितीमध्ये यातील वादी हे प्र.वादी नं. १ यांना म्हणाले की "तुम्ही का घर पाडताय आपण सध्या त्या घरात राहणेस आहे. सदरचे घर पाडल्यास आपण कोठे राहायचे कोठे जायचे " असे म्हणाले असता यातील प्र.वादी नं. १ ही प्र.वादी नं. २ ते ४ यांच्या मतीने यातील वादीच्या अंगावर धावुन आली व शिवीगाळ करुन ठार मारहाण्याची धमकी देवु लागली. तसेच वादींना धाकधपटशहा करुन व शिवीगाळ करुन वादी व त्यांचे कुटुंबियांना बेकायदेशीरपणे घरातुन हाकलुन लावले. सध्य परिस्थितीमध्ये वादी व त्यांचे कुटुंबिय हे अशरश: रस्त्यावर आलेले आहेत. त्यांना राहणेसाठी इतर कोणतेही घर किंवा वास्तव्यासाठी जागा नाही.

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

७) यातील वादी यांनी प्र.वादी नं. १ ते ४ यांना बऱ्याच वेळा विनवण्याकरुन देखील ते एकणेच्या मनस्थितीत नाहीत. ते वादी व त्यांच्या कुटुंबियांना डावलुन बळजबरीने व दांडगाव्याने सदरचे घर पाडुन दुसरे घर बांधण्याच्या तयारीत आहेत. असे झालेस यातील वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. तसेच वादीना राहण्यासाठी दुसरा कोणताही निवारा नाही.

८) सदरचा प्र.वादी नं. १ ते ४ यांचा प्रयत्न हा माहे ऑक्टोबर २०२५पासुन सुरु आहे. त्या बाबत यातील वादी यांनी ग्रामसेवक / सरपंच ग्रामपंचायत सोनाळी, ता. कागल, जि.कोल्हापूर यांचेकडे बांधकाम परवाना न देणे बाबत सदर घराचा असेसमेंट उतारा जोडुन अर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज हा त्यांनी स्विकारलेला आहे व त्या नुसार त्यांनी वरील प्र.वादी नं. १ ते ४ यांना बांधकाम करण्या बाबतची परवानगी देणेत आलेली नाही.

## ९) दावेस कारण -

यातील वादी हे प्रतिवादी नं. १ ते ४ यांना दि. ०६/०२/२०२६ इ. रोजी म्हणाले की, "आहो हे घर जुन आहे पाडु नका आपण तिथे सर्व राहतो तसेच या घराचे काहीही करु नका हे वडिलार्जीत घर आहे सर्व भाऊ व बहिण यांच्या नावावरव आहे. तुम्हाला कोणाच्याही परवानगी शिवाय व ग्रामसेवक व सरपंच, ग्रामपंचायत सोनाळी, ता. कागल, यांची अगर तसम संबंधीत आधिकारी यांची लेखी परवागनी घेतल्या शिवाय तुम्हाला सदरचे घर पाडता येणार नाही अगर बांधकाम अगर डागडुजी करता येणार नाही." असे वादी म्हटले असता प्र.वादी नं. १ ते ४ हे वादी व त्यांच्या कुटुंबियांच्या अंगावर शिवीगाळ करत धावुन गेले व म्हणाले की "तु कोण सांगणार आम्हाला तुझा काय संबंध या घराशी इथुन चालता हो तु हे घर माझे आहे. तु कोर्टात

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

जा किंवा अगर कोठेही जा हे घर मी पाडुन बांधणार कुणाला घेवुन यायचे त्याला ये व वादीना शिवीगाळ करुन गळपट धरुन मारहाण करु लागले. त्यावेळी सदरचे दाव्यास कारण त्या त्या वेळी घडले आहे व घडत आहे.

**१०) दावेचा तपशिल -**

| | | |
|---|---|---|
| रु. | १,०००/- | प्रतिवादी नं. १ ते ४ अगर मित्र तर्फे इसम यांनी दावा मिळकतीचे मालमत्ता पत्रकी नोंद असलेले घर मिळकत सोनाळी, ता. कागल, जि.कोल्हापूर येथील नगर भुमापन गट नं. ४२४ क्षेत्र ३३.७० चौ.मी हे जुने कौलारु दगड, विटा, मातीचे बांधीव २ खोल्यांचे घर मिळकत ही पाडु नये किंवा डागडुजी करु नये किंवा त्यामध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल, विक्री अगर तबदिली करु नये म्हणुन कायम मनाई ताकीदीची दाद मागितली असलेने त्याची आकारणी सदरी दाखल. |
| **रु.** | **१,०००/-** | **एकूण** |

**११) दावेची आकारणी -**

दावेची आकारणी कोर्ट फी व ज्युरिसडिक्शनकरिता व दावा कायम मनाई ताकीदीकरिता दाखल केला असलेने त्यावर महाराष्ट्र कोर्ट फी अॅक्ट कलम ६ (iv) (j) व आर्टीकल २३ शेड्युल्ड २ प्रमाणे योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प जोडलेला आहे.

१२) प्रस्तुत दावेचे कारण या मे. कोर्टाचे स्थलसिमेत घडले असलेने तसेच वादी-प्रतिवादी व दावा मिळकत हे या मे.कोर्टाचे स्थलसिमेत असलेने सदरचा दावा चालविणेचा व त्याचा न्यायनिवाडा करणेचा या मे. कोर्टास पूर्ण हक्क व अधिकार आहे.

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

१३) वादींचा दावा मुदतीत दाखल केला आहे.

१४) वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान अन्य कोणत्याही कोर्टात सदर मिळकतीबाबत वाद अगर दावा प्रलंबित नाही.

१५) यातील प्र.वादी नं. ५ ग्रामसेवक / सरपंच यांना ग्रामपंचायत ॲक्ट १८० प्रमाणे नोटीस पाठविणेची आवश्यकता नाही म्हणुन त्यांना नोटीस पाठविलेली नाही व त्यांना या दावेचे कामी आवश्यक ते पक्षकार केलेले आहे.

**१६) <u>सबब, वादींची विनंती की,</u>**

अ) वादींचा तात्पुरता मनाई अर्ज खर्चासह मंजूर करणेत यावा.

ब) सदरचा दावा निकाल होणेसाठी बराचसा कालावधी लागणार आहे.

क) वादी व प्र.वादी नं. १ ते ४ यांच्या मालकीचे सोनाळी, ता. कागल, जि.कोल्हापूर येथील भुमापन गट नं. ४२४ क्षेत्र ३३.७० चौ.मी हे जुने दगड, माती, विटा, यांचे बांधीव वडिलार्जीत घर पाडु नये किंवा कोणत्याही स्वरुपाची डागडुजी किंवा फेरबदल किंवा तबदिली अगर विक्री करु नये अशी ~~तात्पुरत्या~~ कायम स्वरुपाची यातील प्र.वादी नं. १ ते ४ यांना कायम मनाई ताकिद करणेत यावी.

ड) जरुर तर दावा दुरूस्तीस परवानगी असावी.

इ) न्यायाची अनुषंगिक दाद वादींना याच कामी मिळावी.

-----------------

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

येणेप्रमाणे दावा असे.

कागल

तारीख : १०/०२/२०२६

Drafted and presented by

**Adv. Sunil Shrikant Babar**

**वादीतर्फे वकिल**

सुनिल श्रीकांत बाबर
ॲडव्होकेट
रा.फ्लॅट नं.३०२,अनुप्रित अपार्टमेंट,
दुधाळी ग्राऊंड शेजारी,दुधाळी,रंकाळा टॉवर,
कोल्हापूर.मो.7517521771

## प्रतिज्ञा

मी यातील वादी **शहाजी संतु उर्फ संतराम पोवार,** व.व. ५८, धंदा - शेती व्यवसाय. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील दावेतील कलम १ ते ८ मधील संपूर्ण मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा.

कोल्हापूर

तारीख : १०/०२/२०२६

## ॲफिडेव्हीट

मी यातील वादी **शहाजी संतु उर्फ संतराम पोवार,** व.व. ५८, धंदा - शेती व्यवसाय. घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल जि. कोल्हापूर शपथेवर कथन

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

करतो की, वरील दावेतील संपूर्ण मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट.

~~कागल~~ कोल्हापूर

तारीख : १०/०२/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

**ॲड. सुनिल श्रीकांत बाबर**

सुनिल श्रीकांत बाबर
ॲडव्होकेट
रा.फ्लॅट नं.३०२,अनुप्रित अपार्टमेंट,
दुधाळी ग्राऊंड शेजारी,दुधाळी,रंकाळा टॉवर,
कोल्हापूर.मो.7517521771

## प्रतिज्ञा

मी यातील वादी **शहाजी संतु उर्फ संतराम पोवार,** व.व. ५८, धंदा - ~~व्यवसाय~~ नोकरी घर नं. ३६२, सोनाळी, ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील दावेतील व त्याखालील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा.

~~कागल~~ कोल्हापूर

तारीख : १०/०२/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri Shahaji Santu @ Santram Powar, Age 58 yrs.
of Sonali tal. Kagal, who is
Identified by Shri S. S. Babar Adv.
...........whom I know personally
Dated :- 10.02.2026.

Assistant Superintendent

Order

Issue suit summons to the defendants for the filing of written statement, documents and settlement issues. The defendants shall file the same within 30 days of service of suit summons.

Date : 11/02/2026 C.J.J.D.,Kagal

MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.02.11 17:50:31 +0530